# असंघटित कामगारांना विमा व सुरक्षा योजनांचा लाभ

## ई- श्रम पोर्टलवर नोंदणी आवश्यक

**अकोला :** असंघटित क्षेत्रातील कामगारांनी ई-श्रम पोर्टलवर नोंदणी केल्यास त्यांना विनामूल्य अपघात विमा संरक्षण, सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ, सरकारी योजनांशी थेट जोडणी, तसेच भविष्यातील कल्याणकारी योजनांमध्ये समावेश होणार आहे.महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाच्या वतीने गीग आणि प्लॅटफॉर्म कामगारांना ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन सहाय्यक कामगार आयुक्त यांनी केले आहे.डिलीव्हरी बॉय, फ्रीलान्सर्सला लाभई- श्रम पोर्टलवर झोमॅटो, स्वीग्गी, ओला, अर्बन कंपनी, फ्लिपकार्ट, ॲमेझॉन यासारख्या डिजीटल प्लॅटफॉर्मवर काम करणाऱ्या डिलिव्हरी बॉय, चालक, फ्री लान्सर, घरगुती सेवा पुरवठादार आणि इतर असंघटित कामगारांना नोंदणी करता येईल. १६ ते ५९ वर्षे वयोगटातील कामगार नोंदणी करू शकतात. तथापि, प्राप्तीकर भरणारे, तसेच 'ईपीएफओ' आणि 'ईएसआयसी'चे सदस्य असलेल्या काम गारांना यासाठी अपात्र ठरविण्यात आले आहे.

नोंदणीसाठी आधारपत्र, आधार जोडणी असलेला भ्रमणध्वनी क्रमांक, पॅनकार्ड आणि बँक खाते तपशील आदी आवश्यक आहे. कामगारांनी नोंदणीसाठी महा ई-सेवा केंद्राला भेट द्यावी किंवा अधिकृत पोर्टलवर ऑनलाईन नोंदणी करावी. अधिक माहितीसाठी गोरक्षण रस्त्यावरील श्रद्धा हाइट इमारतीमधील सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय येथे किंवा ०७२४-२४५९२८९ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क

# जलद,कार्यक्षम प्रशासनासाठी 'स्मार्ट व्हिजिटर मॅनेजमेंट सिस्टिम'

## अकोला जिल्हाधिकारी कार्यालयाचा उपक्रम

▪**अकोला,दि ३ (प्रतिनिधी):**

नागरिकांच्या अडीअडचणी, प्रश्नांचा मागोवा घेऊन त्यांचे वेळीच निराकरण व्हावे यासाठी अकोला जिल्हाधिकारी कार्यालयात 'स्मार्ट व्हिजिटर मॅनेजमेंट सिस्टिम' कार्यान्वित करण्यात आली आहे. या प्रभावी समस्या निवारण प्रणालीमुळे प्रशासकीय कामकाज अधिक जलद, कार्यक्षम होणार आहे.

सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर व्हावे (इज ऑफ लिव्हिंग) यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासनाला सात कलमी कृती कार्यक्रम निश्चित करुन दिला आहे. त्यात अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करून कामकाज अचूक, गतिमान व कार्यक्षम करण्यावर जिल्हाधिकारी अजित कुंभार यांच्या मार्गदर्शनात जिल्हा प्रशासनाकडून भर देण्यात येत आहे. 'स्मार्ट



व्हिजिटर मॅनेजमेंट सिस्टिम' प्रणालीच्या माध्यमातून जिल्हाधिकारी यांची भेट घेण्यासाठी येणाऱ्या प्रत्येक नागरिकाची व्यवस्थित नोंद ठेवली जाणार असून, व्यवस्थापन अधिक प्रभावी होण्यासाठी मदत होणार आहे.

**प्रणालीची मुख्य वैशिष्ट्ये**

या प्रणालीमुळे नागरिक, अर्जदार यांचा तपशील, त्यांच्या अडचणी प्रणालीत नोंदवल्या जातील. नागरिकांचा प्राथमिक तपशील.फेस स्कॅनिंग आदी नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून घेतली जाईल. त्यांच्या सर्व भेटींची नोंद डिजिटल स्वरूपात साठवली जाईल जेणेकरून त्यांच्या समस्येवर प्रशासनाने आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीचा मागोवा घेता येईल. भविष्यातील संवाद अधिक सोपा होईल.

### विश्वासार्हता दृढ होईल

**ही प्रणाली प्रशासन आणि नागरिक यांच्यात पारदर्शकता निर्माण करेल तसेच समस्या सोडवण्याची प्रक्रिया अधिक विश्वासार्ह व जलद होईल. यामुळे प्रशासनाची कार्यक्षमता वाढेल आणि लोकांचा शासकीय यंत्रणेवरील विश्वास अधिक दृढ होईल, असा विश्वास जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी व्यक्त केला.**

एखादा नागरिक आपली अडचण घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयात आला तर यापूर्वी तो केव्हा आला होता, कोणत्या कारणासाठी आला होता आणि त्याच्या समस्येवर अद्यापपर्यंत कार्यवाही का झाली नाही याची संपूर्ण माहिती जिल्हाधिकाऱ्यांना सहज पाहता येईल. त्यामुळे समस्येचा थेट पाठपुरावा करता येईल. समस्या सोडविण्याबाबत नोंद जिल्हाधिकारी हे या प्रणालीमध्ये करतील. यामुळे समस्येची सोडवणूक होण्याबरोबरच, पुनरावृत्ती होणाऱ्या तक्रारी वेळीच हाताळता येतील. या प्रणालीमुळे नागरिकांचे प्रश्न आणि शंका यांना जलद गतीने उत्तर मिळेल. जिल्हाधिकारी नागरिकांचे समस्या जाणून घेतल्यानंतर त्वरित निर्णय घेऊन संबंधित अधिकारी यांच्याकडे या प्रणालीद्वारे कार्यवाहीसाठी पाठवतील. यापूर्वी ही प्रक्रिया प्रत्यक्ष कागदपत्रे पाठवून केली जात होती, त्यामुळे अधिक वेळ लागत असे. आता ही प्रक्रिया वेगवान होईल

# शाळेतील कर्मचाऱ्याकडून १० विद्यार्थीनींचा विनयभंग!

▪**अकोला,दि ३ (प्रतिनिधी):**

शाळेतीलच एका कर्मचाऱ्याने तब्बल १० चिमुकल्या विद्यार्थीनींचा विनयभंग केला आहे.या प्रकरणाची माहिती मिळाल्यानंतर चाइल्ड हेल्पलाइनच्या महिला समन्वयक हर्षाली गजभिये यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. ही धक्कादायक घटना अकोला शहरातल्या कौलखेड भागातील एका शाळेत घडली आहे. या घटनेनंतर परिसरात खळबळ उडाली आहे. शाळेतील काही महिला शिक्षिका प्रशिक्षणासाठी बाहेरगावी गेल्या होत्या.५ मार्चपासून शिक्षिका शाळेत उपस्थित नव्हत्या. यावेळी शाळेचे कामकाज सांभाळण्याची जबाबदारी शाळेतील एका



कर्मचाऱ्यावर पडली. हेमंत चांदेकर या आरोपी कर्मचाऱ्याचे नाव आहे. याच परिस्थितीचा फायदे घेत आरोपीने शाळेतील दहा विद्यार्थिनींचा विनयभंग केला आहे.

हे दहा विद्यार्थिनी इयत्ता चौथी आणि इयत्ता सातवीत शिकत असल्याची माहिती समोर आली आहे. आरोपीने परिस्थितीचा फायदा घेत शारीरिक लगट करत विद्यार्थीनींचा),विनयभंग केला आहे. शाळेतील शिक्षिका प्रशिक्षण आटोपून आल्यानंतर विद्यार्थीनींनी सगळा प्रकार शिक्षकांच्या कानावर घातले. तसेच आरोपी कर्मचाऱ्याने काय काय कृत्य केले, सगळी माहिती दिली. यानंतर शिक्षकांना संताप अनावर झाला. त्यांनी कर्मचाऱ्याने केलेल्या कृत्याची माहिती शाळेच्या संचालकांना दिली. संचालकांनी या प्रकाराची तक्रार लगेच चाईल्ड हेल्पलाइनला केली. याप्रकरणी जिल्हा व महिला बालविकास अधिकारी कार्यालयांतर्गत येणाऱ्या चाइल्ड हेल्पलाइनच्या महिला समन्वयक हर्षाली गजभिये यांनी पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार, पोलिसांनी आरोपीला अटक केली. सध्या आरोपी चांदेकरची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आलेली आहे.

# जिल्हा परिषद सीईओ वैष्णवी बी.यांची बदली

▪**अकोला,दि ३ (प्रतिनिधी):**

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक वैष्णवी बी. यांची नागपूर मनपात अतिरिक्त आयुक्तपदी बदली झाली. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने मंगळवारी उशिरा बदलीचे आदेश जारी केले. सीईओ यांनी बुधवारी आपल्या पदाचा प्रभार प्रकल्प संचालक ग्रामीण विकास यंत्रणा मनोज जाधव यांच्याकडे सोपविला.जुलै २०२३ पासून त्या अकोला जिल्हा परिषदेत कार्यरत होत्या. १६ जानेवारी रोजी जिल्हा परिषदेचा कार्यकाळ संपुष्टात आल्यानंतर प्रशासकपदी त्यांची नियुक्ती करण्यात आली होती. मंगळवारी रात्री नागपूर येथे बदलीचे आदेश धडकल्याने बुधवारी जिल्हा परिषदेतील विभागप्रमुखांनी त्यांना निरोप दिला.



# मृद व जलसंधारण कामांचे 'मॅपिंग' करण्यासाठी शिवार फेरी

## नियोजनासाठी बैठकांना सुरुवात

▪**अकोला,दि ३ (प्रतिनिधी):**

राज्यात गत वर्षात झालेल्या मृद व जलसंधारण कामांची प्रत्यक्ष स्थळ पडताळणी होणार असून, यासंबंधीच्या ३९ प्रकारांच्या कामांचे मॅपिंग करण्यासाठी शिवारफेरी काढण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने नियोजनासाठी तालुकास्तरीय बैठकांना सुरूवात झाली आहे. अकोला तालुक्याची बैठक उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे यांच्या अध्यक्षतेत झाली. उपविभागीय जलसंधारण अधिकारी सचिन वानरे, जलसंधारण अधिकारी प्रियांका पंडे, गटविकास अधिकारी एम. डी. मुंडे, तालुका कृषी अधिकारी विजय कोकणे आदी उपस्थित होते. दि. ३१ मेपूर्वी सर्व कामे पूर्ण होतील असे नियोजन करण्याचे निर्देश डॉ. जावळे यांनी दिले.शिवारफेरी कार्यक्रमात प्रत्येक गावात



पथकप्रमुखांसह सरपंच, ग्रामसेवक, तलाठी, कोतवाल, प्रगतीशील शेतकरी, रोजगारसेवक, पाणलोट कार्यकर्ते आदींचा सहभाग असेल. कामांचे मॅपिंग व प्रत्यक्ष स्थळ पडताळणीसाठी 'एमएसआरएसी'ने मोबाईल ॲप्लिकेशन विकसित केले असून, कामांचे उपग्रहाधारित लोकेशन आदी माहिती अपमध्येच उपलब्ध होणार आहे. पथकप्रमुख म्हणून उपविभागीय जलसंधारण अधिकारी, जलसंधारण अधिकारी, कृषी सहायक, पर्यवेक्षक, वनपाल, पाणलोट विकास पथकाचे सदस्य काम पाहतील, अशी माहिती श्री. वानरे यांनी दिली.

## भू-प्रणाम केंद्रांचा आज शुभारंभ

# महसूल मंत्र्याच्या हस्ते होणार व्हर्च्युअल उद्घाटन

▪**अकोला,दि ३ (प्रतिनिधी):**

उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयांच्या ठिकाणी नागरिकांच्या सुविधेसाठी अद्ययावत सोयींसह भू-प्रणाम केंद्र स्थापित करण्यात येत असून, त्याचे व्हर्च्युअल उद्घाटन राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते उद्या, दि. ४ एप्रिल रोजी स. ९.३० वा. होणार आहे.

नागरिकांच्या सेवेसाठी केंद्रात सेतु सेवा केंद्रही कार्यान्वत होत असून, नागरिकांना भूमी अभिलेखविषयक सर्व प्रकारच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. पहिल्या टप्प्यात राज्यातील ३० कार्यालये निवडण्यात आली. त्यात अकोला कार्यालयाचा सम ावेश आहे. नागरिकांच्या सुविधेसाठी स्वागत कक्ष, अभ्यागत कक्ष, स्वच्छतागृहे, सीसीटीव्ही, सूचनाफलक, फर्निचर, संगणक आदी सुविधा असतील. भूमी अभिलेख उपअधिक्षक कार्यालयात उद्या स. ९.३० वा. हा कार्यक्रम होणार असून, मान्यवर पदाधिकारी, अधिकारी उपस्थित राहतील.

## थोडक्यात

### पातूरच्या जुन्या बसस्थानकावर रेस्टॉरंटला आग

**पातूर :** शहरातील जुन्या बसस्थानकावरिल दिलकुश रेस्टॉरंटला आज अचानक भीषण आग लागली. आगीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. आगीचे कारण अद्याप अस्पष्ट असले तरी प्राथमिक अंदाजानुसार शॉर्ट सर्किटमुळे आग लागली असावी, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

महावितरणच्या गलथान कारभारामुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज नागरिकांम धून व्यक्त करण्यात येत होता. शहरात ट्री कटिंगच्या नावाखाली झाडांची छाटणी सुरू असताना दिलखुश रेस्टॉरंटच्या वरती झाडांची छाटणी करून झाडाच्या फांदया हया रेस्टॉरंटच्या तीन पत्रावर पडल्या होत्या. तारेचे घर्षण होऊन या फांद्यांना आग लागली होती. यावेळी अग्निशमन दल आणि नागरिकांच्या प्रयत्नांमुळे आग आटोक्यात आली आगीची माहिती मिळताच पातुर नगरपरिषदेचे अग्निशमन दल तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दल व स्थानिक नागरिकांनी प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले. आगीमुळे कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी, नुकसान झाल्याची माहिती समोर येत आहे. स्थानिक नेते आणि शेकडो युवकांनी धाव घेतली आग लागल्याची घटना समजताच पातुर नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष हिदायत खान, माजी नगरसेवक एजाज भाई बब्बू डॉन, गुड्डू पैलवान, मेहताब यांच्यासह शेकडो युवकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि मदतकार्यीत सहभाग घेतला.घटनास्थळी पातुर नगरपरिषदेचे मुख्य अधिकारी सय्यद अहेसानोद्दीन, अग्निशमन चे अशपाक भाई, प्रल्हाद वानखडे, मुदतशीर सह इतर कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी परिस्थितीचा आढावा घेतला आणि आवश्यक ती मदत पुरवली.

### तेल्हारा परिसरात अवैध गुटखा

**तेल्हारा :** तेल्हारा परिसरात अवैध गुटखा पुरवठा करणाऱ्या विक्रेत्यांचे चांगभले होताना दिसून येत आहे. हा अवैध गुटखा पुरवठा विक्री करणाऱ्या गुटखा माफियांकडे ना प्रशासनाची नजर, ना भीती! यामुळे अवैध गुटखा विक्रेत्यांचे मनोबल वाढत जाऊन राजरोसपणे गावोगाव जाऊन गुटख्यांनी भरलेल्या पोत्याने विक्री करत असल्याचे दिसून येत आहे. महाराष्ट्रात गुटखा प्रतिबंध कायदा हा नावालाच लागूअसल्याचे चित्र तेल्हारा तालुक्यातील हिवरखेड, अडगाव बु, बेलखेड, तेल्हारा, दानापूर, माळेगाव बाजार, पंचगव्हाण, आडसूळ सापडला आहे.

# पातुर-आगिखेड धाबा रस्त्याची दुरवस्था

## नागरीकांची मोठी गैरसोय, प्रशासन का दुर्लक्ष करते?

▪**पातुर,दि ३ (प्रतिनिधी):**

पातुर तालुक्यातील पातुर ते आगिखेड धाबा हा सुमारे ६ ते ७ कि.मी. चा रस्ता अत्यंत खराब झाल्यामुळे नागरिकांचे हाल सुरू आहेत. या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले असून, वाहनचालकांसाठी हा रस्ता अपघाताचा सापळा ठरत आहे.

या खराब रस्त्यामुळे वाहनधारकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. खड्डे चुकवतांना समोरून येणाऱ्या वाहनांची टक्कर होण्याची मोठी शक्यता आहे. यामुळे दररोज अपघात होत असून, नागरिकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.या रस्त्यालगत असलेल्या आगिखेड, खामखेड आणि पाडी या गावातील विद्यार्थ्यांना जीव धोक्यात घालून शाळेत जावे लागते. सायकलस्वार आणि दुचाकीस्वारांसाठी हा रस्ता अत्यंत धोकादायक बनला आहे.

गंभीर आजारी रुग्णांची वेळेवर रुग्णालयात ने-आण करणे कठीण होत आहे. अनेक वेळा रस्त्याच्या खराब अवस्थेमुळे रुग्णवाहिका वेळेत पोहोचू शकत नाही, परिणामी रुग्णांना जीव गमवावा लागू शकतो.

आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेला देखील अडथळे येत आहेत. उन्हाळ्याच्या दिवसांत जर कोणत्या गावात आगीसारखी आपत्ती



उद्भवली, तर अग्निशमन दलाच्या गाड्या वेळेवर पोहोचण्यास अपयशी ठरू शकतात.

या समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी स्थानिक नागरिकांनी वारंवार प्रशासनाला निवेदने दिली आहेत आणि वृत्तपत्रांमधून आवाज उठवला आहे. मात्र अद्याप प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी कोणतीही ठोस कार्यवाही केलेली नाही.'या रस्त्याने प्रवास करणे कठीण झाले असून, मोठ्या अपघातांची शक्यता नाकारता येत नाही.

# छत्रपती शिवरायांचा स्मृतिदिन अखिल भारतीय मराठा महासंघातर्फे अभिवादन

▪**अकोला,दि ३ (प्रतिनिधी)**

शिवप्रेमीच्या हृदयस्थानी असलेले महाराष्ट्राचे आराध्य दैवत हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मृतिदिना निमित्ताने सहकार नगर येथील शिवछत्रपतींच्या पुतळ्याचं पूजन व हारार्पण करून अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने त्यांच्या चरणी नतमस्तक होऊन अभिवादन करण्यात आले. यावेळी अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष विनायकराव पवार, ज्येष्ठ मार्गदर्शक मनोहर मामा हरणे, जिल्हाध्यक्ष संजय सूर्यवंशी महानगर अध्यक्ष श्रीकांत सरोदे क्रीडा विभाग जिल्हाध्यक्ष राजेश पाटील महिला विभागीय अध्यक्ष सौ कल्पनाताई बिडवे,उपाध्यक्ष माधुरीताई वाघमारे, महिला म



हानगर अध्यक्ष रश्मी पटेकर, उबाठा शिव सेना जिल्हाप्रमुख मंगेश काळे, मनसे जिल्हाध्यक्ष पंकज साबळे, पंकज जायले अरुण खोटरे काशिनाथ पटेकर प्रदीप लुगडे उपस्थित होते.

### बसवर दगडफेक

**अकोला :** गेल्या अनेक वर्षापासून माहेरी राहत असलेल्या आपल्या पत्नीने नांदण्यासाठी घरी परत द्यावे यासाठी व्याकुळ असलेल्या पतीने बसवर दगडफेक केल्याची घटना वानखेडे या ठिकाणी घडली असल्याचे समोर येत आहे प्रकाश पिंजरकर हे त्या व्याकुळ पतीचे नाव असून त्याची पत्नी हे गेल्या पंधरा वर्षापासून आपल्या पटत नसल्यामुळे माहेरी राहत होते.

# जात पडताळणी त्रुटींचे निराकरण करणार

## मंगळवारी लोकशाहीदिन उपक्रम

▪**अकोला,दि ३ (प्रतिनिधी):**

जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या वतीने मंगळवार, दि. ८ एप्रिल रोजी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले आहे.

त्यात जात पडताळणीच्या प्रलंबित अर्जांतील त्रुटी दूर करून अर्ज निकाली काढण्यात येतील.समितीचे सर्व सदस्य लोकशाही दिनी उपस्थित राहणार आहेत. ज्या उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज सादर केले आहेत.

अशा उमेदवारांचे त्रुटीमुळे प्रकरण प्रलंबित असल्याबाबत पूर्तता करून घेऊन निराकरण करण्यात येईल.सर्व उमेदवारांनी समिती कार्यालयात उपस्थित राहुन सदर संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन समितीचे अध्यक्ष जितेंद्र सा. काकुस्ते, उपायुक्त तथा सदस्य अमोल यावलीकर व संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव मनोज मेरत यांनी केले आहे.

# मोठ्या राम मंदिरात मातृशक्तीच्या भजनांचा जल्लोष

▪**अकोला,दि ३ (प्रतिनिधी):**

टिळक मार्गावरील प्राचीन व संत गजानन महाराज यांच्या प्रेरणेने स्थापित मोठ्या राम मंदिरात सुरू असलेल्या रामनवमी उत्सवात विविध महिला पुरुषांच्या भजनी मंडळाच्या भजन कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.उत्सवात गुरुवारी स्वरदिती महिला भजनी मंडळ दाबकी रोडचा भजन कार्यक्रम मोठ्या भक्तिभावात संपन्न झाला.या दिनी मंदिरात धननिळ पाटील व सौ विद्या जायले यांची भजन संध्या संपन्न झाली.यात गायकांनी विविध भक्तिगीते व भजने सादर केली होती.यावेळी आयोजित या सामूहिक भजनांचा लाभ घेण्यासाठी महिला पुरुष रामभक्तांनी एकच गर्दी केली होती.या उत्सवात आज शुक्रवार दिनांक ४ एप्रिल रोजी दुपारी ३-३० वाजता ज्ञानाई महिला भजन मंडळ दाबकी रोड, संध्या ५ सई रानडे यांची नृत्य नाटिका होणार आहे.शनिवार दिनांक ५ एप्रिल रोजी दुपारी ३,-३० वाजता स्वरचना महिला भजनी मंडळ, दुपारी ४-३० वाजता राजपूतपुरा येथील रामभक्त मंडळाचे सुंदरकांड होणार आहे. राम जन्मदिनी रविवार दिनांक ६ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता मंदिरात राम जन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे. सोमवार दिनांक ७ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता गोपालकाला



कीर्तन, दुपारी ३ वाजता गजानन महिला भजन मंडळ व संध्याकाळी ५-३० वाजता श्रीराम व हरिहर पालखी सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

उत्सवाची समाप्ती मंगळवार दिनांक ८ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता सुंदरकांड व रात्री ८ वाजता एकादशी कीर्तनाने होणार आहे. पंचक्रोशीतील समस्त रामभक्त महिला पुरुषांनी प्राचीन अशा मोठ्या राम मंदिरातील या उत्सवाचा मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन श्रीराम व हरिहर संस्थान अकोला यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# संत शिरोमणी रुपलाल महाराज पुण्यतिथी साजरी



▪**अकोला,दि ३ (प्रतिनिधी):**

स्थानिक अकोला शहरात बारी समाजाचे संत शिरोमणी रूपलाल महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त महाप्रसाद कार्यक्रम श्रीराम मंदिर रामदास मठ सुभाष चौक अकोला येथे उत्साहात संपन्न झाला.उपरोक्त कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख तथा उपनेते मा.आ.गोपीकिशन बाजोरिया हे लाभले होते. सर्वप्रम ुख पाहुणे व समाज बांधव च्या हस्ते संत रूपलाल महाराजांचे पूजन व आरती करण्यात आली.

संत रुपलाल महाराज पुण्यतिथीच्या कार्यक्रमाला सर्व समाज बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला तसेच इतरही अकोला शहरातील अनेक सामाजिक, धार्मिक व राजकीय मान्यवर मंडळींनी बहुसंख्येने उपस्थित दर्शविली व महाप्रसादाचा लाभ घेतला.असे बारी युवा बहुउद्देशीय व क्रीडा संस्था, अकोला तर्फे अध्यक्ष गोपाल नागपूरे यांनी कळविले आहे.

